**सवय**

तुझा थेट चंद्राशीच
संबंध - संपर्क म्हणून
मी बोललो त्याच्याशी
तुझ्याबद्दल
आणि
त्यानं सांगितलीय
तुझी कहाणी मला
तरीही
मी नाही सांगणार
तुला तो काय म्हटला ते
असं
तू अगदी पहिल्या भेटीत
सांगितलंस मला
तेव्हा
वाटलं; आयुष्य अगदीच
अंधारलेलं नाहीये
माझी
झाडांशी मैत्री आहे
कळलं तेव्हा म्हटलास
मला त्या झाडाला भेटायचंय
अन् तुझ्या बोटांच्या स्पर्शखुणा
स्पर्शून घेणार आहे
फांदीवर कोरल्या गेलेल्या
तेव्हा बहरण्याचे मोसम येतील
आपल्याही वाटेवर म्हणून
वठलेल्या
मनालाच पालवी फुटली
ऋतुची स्वप्नं दिवसाउजेडी
दिसू लागली
तरीही चंद्र अन् ऋतु
लहरीप्रमाणे वागतात
हे जमेस धरायलाच
हवं होतं मी
तुझ्याबद्दल काय बोलू
चंद्र, झाड अन् मी
हवं तर बघायचं किंवा
पाठ करून चालायचं
या तुझ्या
सवयीशी परिचित
नव्हते ना मी...

**चंद्र हरवला**

चंद्र हरवल्याच्या हुरहुरीत
मी कितीतरी दिवस
हळहळत राहिले..
मग चंद्र जिथे उगवत नाही
असा प्रदेश शोधत राहिले
कितीतरी वर्ष..
नंतर शोधत राहिले
अशा माणसांना, ज्यांच्या हातून
चंद्र हरवला गेला..
घेत राहिले अदमास
त्यांच्या दु:खाचा अन्
परिणामांचाही..
आजमावून पहात राहिले
त्यांचं वावरणं
माझ्या चंद्र हरवल्याच्या जखमेशी..
काही तपानंतर लक्षात आलं
आपण काहीच हरवत नसतो
चंद्रच लहरीप्रमाणे येतो न जातो..
आपण सांभाळत राहिलो
चंद्राच्या आठवणी अन्
सडवत राहिलो युगं..
या जन्मी आपल्यातल्या नात्याला
चंद्रमाध्यम ही
शब्दभूल उतरली हे काय कमी?
आता अष्टौप्रहर चंद्र असला दिमतीला
तरी त्याचं अप्रूप
उरलंय कुठे?

**आठव**

या भगभगीत दुपारी
आठवताहेत
तुझे माझ्याबरोबर असण्याचे
काही कवडसे
आयुष्य वैराण वाळवंट
तुझे बोल झुळूक मुलायम
असं म्हणायचा ते दिवस
किती झरकन् ओसरले
पळस पांगाऱ्याचं फुलणंही
वाढवतोय दाह
ते छिन्नविछिन्न होणं आठवलं की..
खरं तर हे पोळण्याचे तडाखेच
जगणं असावं
काहिली पदरात टाकणारी
माणसं असताना
आपण आग ओकतो म्हणून
सूर्यालाच
का दोषी धरावं?

**अस्मिता गुरव**
जळगाव
भ्र. ९९२२ ४३८ ४११